रयत शिक्षण संस्थेचे

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली )

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा 2021

**गीत गायन स्पर्धा अहवाल**

महाविद्यालयामध्ये पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त दि. 20 सप्टेंबर 2021 रोजी सकाळी 11 वाजता गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी ज्युनियर व सिनियर महाविद्यालयातील 10 स्पर्धकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. एल. डी. कदम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. टी. एस भोसले हे उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना माननीय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी आपल्यातील कलागुणांना वाव मिळवून द्यावा यासाठीच या स्पर्धांचे आयोजन केले जाते याचा उल्लेख केला. या स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी हिंदी व मराठी भाषेतील चित्रगीत, भावगीत, भक्ती गीत आणि लोकगीत इत्यादी प्रकारातील गीत गायन सादर केले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून महाविद्यालयातील प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, प्रा. डॉ. श्रीमती पाटील यु. व्ही. आणि प्राध्यापक शेळके यु. एस. यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये ज्युनियर विभागातून प्रथम तीन क्रमांक व एक उत्तेजनार्थ तसेच सीनियर विभागांमधून प्रथम तीन क्रमांक व एक उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक स्टाफ हजर होते.

ही स्पर्धा पार पाडण्यासाठी गीत गायन स्पर्धेचे प्रमुख प्रा. डॉ. खाडे ए. एस. व त्यांचे सहकारी प्रा. डॉ. सोनवले आर. आर. प्रा. शेळके यु. एस प्रा गळवे यांनी सहकार्य केले. गीत गायन स्पर्धा महाविद्यालयामध्ये ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आली. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी covid-19 च्या संदर्भातील शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन केले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामुळेच ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.

**लाभार्थीः 35**

**निष्पत्तीः** 1. विद्यार्थ्यांच्या गीत गायन या कलागुणास मुक्त व्यासपीठ उपलब्ध झाले.

2. विद्यार्थ्यांना विविध गीत गायन प्रकारात विद्यार्थ्यांना आपले गायन सादर करण्याची संधी मिळाली.

3. विविध प्रकारातील स्पर्धांमध्ये आपण टिकून राहण्यासाठी स्पर्धा करावी लागते हे विद्यार्थ्यांना माहीत झाले.

4. गीत गायन स्पर्धेत सुमधुर आवाज, तालबद्धपणा व गीताची चाल याला महत्व असते हे विद्यार्थ्यांना समजले

प्रमुख
गीत गायन स्पर्धा

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली)

गीत गायन स्पर्धा क्षणचित्रे

गीत गायन स्पर्धा उद्घाटन प्रसंगी मान्यवर मा. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. खाडे







उपस्थित स्पर्धक व प्राध्यापक वर्ग



विध्यार्थिनी  स्पर्धक गीत गाताना



कोविड 19 चे  स्पर्धकांनी नियम पाळले



गीत गायन सादर करताना विद्यार्थिनी स्पर्धक



स्पर्धेचे परीक्षक परीक्षण करताना



मा. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम मार्गदर्शन करताना